# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:-रानिआ/२०१०/प्र.क्र. ४ /का.०५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ३०/०७/२०११

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी

विषय :- मतदार यादी व मतदान केंद्र निश्चितीबाबत निकष...
संदर्भ :- आयोगाचे समक्रमांकाचे दि. २७/९/२०१० चे पत्र.

महोदय,

संदर्भाधिन पत्रान्वये महानगरपालिका / नगरपरीषद / नगरपंचायत निवडणुकांकरीता मतदान केंद्राचे निकष निश्चित करण्यात आले असून त्यानुसार प्रत्येक मतदान केंद्रावर मतदारांची संख्या साधारणपणे १००० च्या दरम्यान ठेवण्यात येते. शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता इतर महानगरपालिका तसेच सर्व नगरपरिषदा / नगरपंचायतीमध्ये बहुसदस्यिय प्रभाग पध्दत लागू केली आहे. त्यास अनुसरुन मतदान केंद्राचे सुधारीत निकष सोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये निश्चित करण्यात येत आहेत.

निवडणूका निःपक्षपातीपणे पार पडण्याकरीता मतदार यादया निकोप वातावरणात होणे आवश्यक आहे. यादयांचे प्रभागनिहाय विभाजन करताना विधानसभा यादीतील मतदार कोणत्या प्रभागात जातात हे शोधण्यासाठी नेमलेले अधिकारी / कर्मचारी मतदारयादीचे गांभीर्य लक्षात न घेता अथवा काही ठिकाणी राजकीय दबावाला बळी पडून मतदार यादया तयार करतात. चुकीच्या यादयांमुळे मतदारांना आपला योग्य प्रतिनिधी निवडून देणे शक्य होत नाही. यावर नियंत्रण ठेवण्याकरीता मतदार यादीबाबतचे निकषदेखील सोबतच्या परिशिष्ट -२ मध्ये निश्चित करण्यात येत आहेत.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

सही/-
( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

## परिशिष्ट -१

## मतदान केंद्राच्या निश्चितीबाबतचे निकष

महानगरपालिका / नगरपरिषद व नगरपंचायतीच्या प्रत्येक प्रभागात खालीलप्रमाणे मतदान केंद्र निश्चित करण्यात यावीत :-

१. मतदान केंद्राना जोडण्यात येणाऱ्या मतदारांची संख्या खालीलप्रमाणे असावी :-

| अ.क्र. | स्थानिक स्वराज्य संस्था | कमाल मतदारांची संख्या |
|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई महानगरपालिका | १००० |
| २ | उर्वरित सर्व महानगरपालिका | ८०० |
| ३ | नगरपरिषद | ६०० |

२. कोणत्याही मतदाराला मतदान केंद्रावर पोहचण्यासाठी दोन कि.मी.पेक्षा अधिक अंतर प्रवास करावा लागणार नाही याची दक्षता घेऊन ज्या ठिकाणी विरळ लोकवस्ती असेल तेथे कमी मतदारांसाठी देखील मतदान केंद्र देता येईल.

३. जोडलेली मतदार यादी विचारात घेऊन प्रत्येक मतदान केंद्राचे कार्यक्षेत्र निश्चित करावे.

४. मतदान केंद्राचे स्थान निश्चित करताना त्या मतदान केंद्रावर जोडलेले मतदार हे सलग क्षेत्रातील असणे अवश्यक आहे.

५. मतदान केंद्र शक्यतो मध्यवर्ती ठिकाणी असावे.

६. मतदान केंद्र शासकीय, निमशासकीय, अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इमारतीत असायला हवे. मात्र सोयीस्कर शासकीय, निमशासकीय इमारती उपलब्ध नसल्यास कोणत्याही खाजगी जागेत मतदान केंद्र ठेवण्यास हरकत नाही. मात्र खाजगी इमारतीमध्ये मतदान केंद्राची निवड करताना कायदा व सुव्यवस्था वा इतर कोणत्याही कारणास्तव अडचण किंवा वाद निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

७. खाजगी इमारतीत मतदान केंद्राची निवड केल्यास इमारतीच्या मालकाची संमती घेणे आवश्यक आहे.

८. मतदान केंद्र कोणत्याही धार्मिक स्थळी असणार नाही.

९. मतदान केंद्र पक्क्या इमारतीत असायला हवे. पावसाळयात अशा इमारतीमध्ये छपरातुन पाणी येणार नाही याची दक्षता घ्यावी.

१०. ज्या ठिकाणी मंडपात मतदान केंद्र असेल तेथे पावसाळ्याच्या दिवसात ताडपत्रीची व्यवस्था करण्यात यावी. उन्हाळ्यात रांगेतील मतदारांसाठी सावली मिळेल अशी व्यवस्था करावी.

११. सुरक्षिततेच्यादृष्टीने व मतदारांच्या सोयीच्यादृष्टीने ही इमारत योग्य असायला हवी.

१२. इमारतीत पिण्याच्या पाण्याची, प्रसाधनगृहाची सोय असावी. शक्य तोवर मतदान केंद्रात जाण्यायेण्यासाठी स्वतंत्र दरवाजे असणे आवश्यक आहे.

१३. वृध्द, गरोदर स्त्रिया, अपंग व्यक्ती यांना मतदान करतांना अडचण येऊ नये म्हणून मतदान केंद्र तळमजल्यावर ठेवणे व रॅम्पची व्यवस्था असणे आवश्यक आहे. अपवादात्मक परिस्थितीमध्ये पहिल्या किंवा दुस-या मजल्यावर केंद्र ठेवावयाचे असल्यास लिफ्टची व्यवस्था असावी.

१४. मतदान केंद्र हवेशीर व नैसर्गिक प्रकाश असणारे असणे आवश्यक आहे.

१५. कोणत्याही प्रभागाचे मतदान केंद्र त्या प्रभागाच्या क्षेत्राच्या बाहेर असता कामा नये. अपवादात्मक परिस्थितीमध्ये महानगरपालिकांसाठी महानगरपालिका आयुक्त व नगरपरिषदांसाठी जिल्हाधिकारी यांची पूर्वपरवानगी घेऊन असे मतदान केंद्र ठेवता येईल. प्रभागाबाहेर ठेवलेल्या मतदान केंद्रांबाबतचा अहवाल राज्य निवडणूक आयोगाला पाठविण्यात यावा.

१६. साधारणपणे प्रभागामध्ये एका इमारतीमध्ये दोनपेक्षा जास्त मतदान केंद्रे असता कामा नयेत. मात्र एखादी इमारत मोठी असेल व इमारतीला वेगवेगळया विंग असतील तर अशावेळी प्रत्येक विंगमध्ये दोन मतदान केंद्रांच्या मर्यादेच्या अधीन राहून मतदान केंद्रे ठेवता येतील. मात्र असे करताना कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने तसेच मतदारांच्या सोयीच्या दृष्टीने अडचणी निर्माण होणार नाहीत याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

१७. मतदान केंद्राचे स्थान निर्देश व मार्गाचा नकाशा तयार करणे आवश्यक आहे.

१८. मतदान केंद्राची यादी तेथे जोडलेल्या मतदाराच्या यादीसह व मार्गाच्या नकाशासह प्रसिध्द करण्यात यावी.

१९. वरीलप्रमाणे मतदान केंद्र निश्‍चित केल्यानंतर व यादी प्रसिध्द झाल्यानंतर जर काही कारणास्तव अपवादात्मक परिस्थितीत मतदान केंद्राचे स्थान किंवा इमारतीमध्ये बदल करावयाचा असल्यास महानगरपालिकेच्या निवडणुकीबाबत महानगरपालिका आयुक्त व इतर निवडणुकांच्याबाबतीत जिल्हाधिकारी याची पूर्वपरवानगी घेण्याची आवश्यकता राहील व तसे राज्य निवडणूक आयोगास अवगत करावे.

# परिशिष्ट -२

## मतदार यादी  बाबतचे निकष

१.  महानगरपालिका / नगरपरिषद व नगरपंचायती क्षेत्रात येणा-या विधानसभेची राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेली मतदार यादी  प्राप्त करुन ती संबंधित प्रभागांमध्ये फोडणे आवश्यक आहे. अशी यादी फोडल्यानंतर विधानसभेचे एकूण मतदार, महानगरपालिका/नगरपरिषद क्षेत्रात समाविष्ट असलेले मतदार व क्षेत्राबाहेर असलेले मतदार यांचा ताळमेळ लावणे आवश्यक आहे.  असा ताळमेळ यादीच्या शेवटी अथवा सुरवातीस जोडण्यात यावा.

२.  मतदार यादया अधिप्रमाणित करताना प्रत्येक पानावर महानगरपालिका / जिल्हाधिकारी कार्यालय यांचा शिक्का व ती तयार करणा-या अधिकारी/ कर्मचारी याची सही असावी. यादीच्या शेवटी अधिप्रमाणित करणा-या अधिका-यांचा  शिक्का व सही असावी.

३.  मतदार यादीवर वरच्या बाजूस अधिसूचित दिनांकाचा अर्थात मतदार यादी ग्राहय धरण्याच्या दिनांकाचा  स्पष्ट उल्लेख असावा.

४.  प्रारुप मतदार यादीच्या प्रत्येक पानावर यथास्थिती प्रारुप / अंतिम मतदार यादी  असे नमूद करण्यात यावे अथवा शिक्का मारावा.

५.  मतदार यादी खालील नमुन्यामध्ये असेल.

**--------- महानगरपालिका /नगरपरिषद/ नगरपंचायत सार्वत्रिक / पोट निवडणूक महिना/वर्ष**

विधानसभा मतदार यादी ग्राहय धरण्याचा दिनांक----------------

प्रभाग क्र.                                                   मतदान केंद्र क्र.

| अ.क्र. | विधानसभा यादी तपशिल | | | घर क्र. | नाव | नातेवाईकाचे नाव | नाते* | लिंग# | वय | शेरा (ओळखपत्र क्र.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मतदार संघ | यादी भाग | अ. क्र. | | | | | | | |
| १ | १३९ | १० | ५३५ | १५ | रमेश बाबाजी सावंत | बाबाजी सावंत | व | पु | ३५ | १२३४५६ |
| २ | १३९ | १० | ५३६ | १५ | उमेश बाबाजी सावंत | बाबाजी सावंत | व | पु | ३३ | १२३४७७ |
| * व = वडील<br># पु = पुरुष | | | | | | | | | | |

------------